## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक- ३०/२०१९/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| श्री. गणेश रंगनाथ दातार | जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक सातारा वनविभाग, सातारा यांचे कार्यालय, वनभवन रोपवाटिका परिसर, सातारा ४१५ ००१<br>प्रथम अपिलीय अधिकारी, तथा सहाय्यक वनसंरक्षक, (वनीकरण व कॅम्पा) सातारा. |

**(निर्णय दिनांक-२०/०२/२०२५)**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार दिनांक १८/०१/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी, माहिती मिळवण्यासाठी पाठपुरावा करुनही मागणी केलेली माहिती देण्यात आलेली नाही, तसेच विनंती करूनही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही , अशा आशयाची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

उपलब्ध अभिलेखावरून असे दिसून येते की तक्रारदार यांच्या विनंतीनुसार प्रथम अपिलाची पुन्हा सुनावणी आयोजित करण्यात आलेली नाही तसेच सुनावणीअंती आदेश पारित केले नाहीत. तक्रारदार यांना माहितीचे प्रदान झाले नाही.

महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक, केमाअ- २००७/११८२/प्रक्र-६५/०७/६( माआ) २००७ दिनांक १२ डिसेंबर २००७ व शासन परिपत्रक क्रमांक केमाअ २००७/७४/प्र.क्र १५४/०७/६ दिनांक ३१ मार्च २००८ अन्वये सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कडे प्राप्त होणारी प्रथम अपीले ही समन्यायिक स्वरूपाची असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करणे क्रमप्राप्त आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण विहित काल मर्यादेत निकाली काढण्याबाबत तसेच महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, परिपत्रक क्रमांक- मुमाआ २०१९/प्रक्र ५०/०१ दिनांक २५ जून २०१९ अन्वये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून सुनावणी घेऊन अनुषंगिक आदेश देणे आवश्यक आहे असे निर्देश दिले आहेत. तसेच जर जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पुरवण्याचे आदेश दिले असतील तर त्याची पूर्तता होते की नाही याकडे लक्ष देणे ही प्रथम अपिलीय अधिकाऱ्याची जबाबदारी आहे असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध अभिलेखावरून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडून या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकातील निर्देशानुसार तक्रारदार यांच्या प्रथम अपील प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने ३० दिवसात कार्यवाही पूर्ण करून तसे तक्रारदार यांना लेखी स्वरूपात कळविण्यात यावे. या निर्देशासह सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-३०/२०१९/सातारा /7386/2025 दिनांक - 6/3/2025